MHKO050037992021

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२७३/२०२१</u>**

अंजना खंडू भंडारे व इतर

विरुद्ध

धोंडीराम शिवा उर्फ शिवाजी भंडारे व इतर

**<u>निशाणी क्र.३२ खाली आदेश.</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन अतिरिक्त वादप्रश्न काढण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे आजतागायत सादर केले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालवण्यात येतो.

**०२.** अर्जाचे अवलोकन केले व वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०३.** वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी असे कथन केले की, प्रस्तुत कामात प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी आपली कैफियत नि.२९/ब वर दाखल केलेली असून, सदर कैफियतीमधील परिच्छेद क्र.२ मधील नमूद मजकूरामध्ये असे म्हटले आहे की, वादी, प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.६ ते १० यांनी त्यांना येणारा दावा मिळकतीतील हिस्सा दि.२२/०७/२००० रोजीच्या नोटरी दस्ताने प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचे पूर्वाधिकारी रंगराव शिवा भंडारे यांच्या लाभात सोडून दिलेला आहे. वादीने पुढे असे कथन केले की, प्रस्तुत कामात नि.३१/ब वर वादप्रश्न काढलेले आहेत व वरील नमूद मजकुराप्रमाणे वादप्रश्न निश्चित होणे आवश्यक असून सदरचा वादप्रश्न मा.न्यायालयाने अद्याप काढलेला नाही. सबब, वादीतर्फे विधीज्ञांनी खालीलप्रमाणे अतिरिक्त वादप्रश्न काढण्याची विनंती केली;

“Does defendant no. 2 to 5 prove that they have acquired right, interest title, in suit property as per the notarized release of right deed serial no.4352/2000 dated 22/07/2000?”

वादीतर्फे विधीज्ञांनी पुढे असे कथन केले की, सदरचा अतिरिक्त वादप्रश्न काढल्याने प्रस्तुत दाव्याच्या अंतिम व पुर्ण न्यायनिवाड्याकरिता मदत होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज दि.०९/०२/२०२३ रोजी दाखल केलेला असून आजतागायत प्रतिवादींनी आपले म्हणणे सादर केले नाही. अर्जातील कथने तसेच प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी दिलेली कैफियत यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तावीत वादप्रश्न निश्चित होणे प्रस्तुत दाव्याच्या पुर्ण निर्णयाकरिता आवश्यक आहे. सदरचा अतिरिक्त वादप्रश्न काढल्यास

प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. किंबहूना प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या कैफियतीमधील कथनाप्रमाणे दावा मिळकतीबाबत वस्तुस्थिती समोर येण्यास तसेच दाव्यातील पक्षकारांचे अधिकार योग्यरित्या सिध्द होण्यास मदत होईल. सबब, आदेश खालीलप्रमाणे;

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज (नि.३२) हा मंजूर करणेत येतो.

२) "Does defendant no. 2 to 5 prove that they have acquired right, interest title, in suit property as per the notarized release of right deed serial no.4352/2000 dated 22/07/2000?" हा अतिरिक्त वादप्रश्न नि.३१/ब वर निश्चित करण्यात येतो.

३) उभय पक्षकारांनी सदरच्या वादप्रश्नाची नोंद घ्यावी.

सही/-

दिनांक :२२/०८/२०२५
ठिकाण : इचलकरंजी.

**(एम.एस.गावडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**इचलकरंजी.**